# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : २अ/एडीएम/२०१७/ 9098
दिनांक 18 AUG 2017

**विषय:- व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना पदवी प्रमाणपत्र सादर करण्यासाठी देण्यात आलेली दिनांक २२/०८/२०१७ मुदत दिनांक ३१.८.२०१७ वाढविणेबाबत.**

**संदर्भ : संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१७/९६६, दिनांक ९.८.२०१७**

मुंबई विद्यापीठातील पदवी अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्याने व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदवारांना पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या गुणपत्रिका कट ऑफ दिनांकापर्यंत प्रवेश घेतलेल्या संस्थेत सादर करणे शक्य होत नसल्यामुळे व कट ऑफ दिनांकापुर्वी प्रवेश पात्रतेच्या गुणांची पुर्तता होत नसल्यास संबंधित उमेदवारांचे प्रवेश रदद होतील हया बाबींचा आणि त्यांच्या शैक्षणिक भवितव्याचा सहानुभुती पूर्वक विचार करुन संबंधित उमेदवारांना त्यांचे गुणपत्रक प्रवेश झालेल्या संस्थेत सादर करण्यासाठी संदर्भाधीन दिनांक ९.८.२०१७ रोजीच्या परिपत्रकानुसार दिनांक २२/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती व प्रवेशासाठी Cut Off date २४ ऑगस्ट २०१७ अशी निश्चित करण्यात आली होती.. तथापि अद्यापही मुंबई विद्यापीठाचे निकाल जाहीर होण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे गुणपत्रिका सादर करण्यासाठी **दिनांक २२.८.२०१७ पर्यंत देण्यात आलेली मुदतवाढ दिनांक ३१.८.२०१७ पर्यंत वाढविण्यात येत आहे.**

व्यावसायिक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना पदवी अभ्यासक्रमाचे अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची प्रत दिनांक ३१.८.२०१७ पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. ज्या उमेदवारांना गुणपत्रिकेची मूळ प्रत दिनांक ३१/०८/२०१७ पर्यंत प्राप्त होऊ शकणार नाही अशा उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने प्राप्त होणारे गुणपत्रक ते ज्या संस्थेतून पदवी परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या संस्थेच्या प्राचार्यांकडून प्रमाणित करुन ते दिनांक ३१/०८/२०१७ पर्यंत त्यांना प्रवेश मिळालेल्या संस्थेत सादर करावे;किंवा विद्यापिठाच्या निकालाच्या स्टेटमेंट / रजिस्टर वरुन सुध्दा गुणांची पडताळणी केलेली प्रमाणपत्रे प्राचार्यांकडून प्रमाणित करुन दि. ३१/०८/२०१७ पर्यंत प्रवेश घेतलेल्या संस्थेत सादर करु शकतील. त्यावरुन प्रवेशासाठी नियमावलीनुसार आवश्यक किमान पात्रता गुणाची पुर्तता करणाऱ्या सबंधित उमेदवाराचा प्रवेश कायम करण्यात येईल.

अशा प्रकारे उपरोक्त दिनांकापर्यंत पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाची गुणपत्रिका सादर करू शकत नसलेल्या या उमेदवारांनी संस्थेकडे **"सदर प्रवेश हा तात्पुरता प्रवेश असून पदवी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाची गुणपत्रिका सादर करण्याच्या अटीच्या अधीन दिलेला आहे याची जाणीव असून निकालानंतर सदर प्रवेशासाठी किमान पात्रतेची पूर्तता होत नसल्यास माझा प्रवेश रद्द होईल याची मला जाणीव आहे "** अशा आशयाचे हमीपत्र सादर केल्यावर त्याचा प्रवेश तात्पुरत्या स्वरूपात सुरू ठेवावा.

मात्र एमबीए/एमएमएस व एमसीए पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची Cut Off Date २४.८.२०१७ तर M.E./M.Tech, M.Pharmacy,M.Architecture इ.अभ्यासक्रमासाठी प्रवेशाची Cut Off Date ३१.८.२०१७ अशी आहे व तदनंतर केलेले कोणतेही प्रवेश ग्राहय धरले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

(दयानंद मेश्राम)
सहसंचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत:- १. आयुक्त, राज्य समायिक प्रवेश परीक्षा, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पू), मुंबई — ४०० ००५. यांना माहितीस्तव.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर यांना सदर बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावी

३. माहिती तंत्रज्ञान कक्ष, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यासाठी

E:\Budage\2017-18\MBA MMS\extension for submission final year marksheet upto 31.8.2017.docx